सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. १२४/२०२३

विषय : महाविद्यालयातील सुरू असलेल्या शिक्षकी पदांच्या भरतीप्रक्रियेत दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत...

संदर्भ : मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. उशिसं/२०२३/दिव्यांग आरक्षण/मवि-१/६२३५, दि. १६ मे, २०२३.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/ परिसंस्था यांना कळविण्यात येते की, मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी उच्च शिक्षण विभागाच्या अधिकार कक्षेतील अशासकीय महाविद्यालयातील सुरू असलेल्या 'शिक्षकी पदभरती प्रक्रियेत दिव्यांग आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत निर्देश दिलेले आहेत. (सोबत: प्रत)

दि. २८ डिसेंबर, २०१६ रोजी प्रकाशित दिव्यांगांचे अधिकार कायदा २०१६, विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दि. १८ जुलै, २०१८ मधील नियमांचे तसेच शासन निर्णय क्र. दिव्यांग/२०१८/प्र.क्र.११४/१६अ दि. २९ मे, २०१९ व वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांचे पालन होणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार संस्था/महाविद्यालयांनी दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

उपरोक्त राजपत्रामध्ये नमूद केल्यानुसार रिक्त पदांच्या ४ % पेक्षा कमी नाही एवढी पदे दिव्यांगांसाठी आरक्षित करण्याबाबत निर्देश दिलेले असल्याने दिव्यांग आरक्षण एकूण मंजूर पदांवर न ठरविता तत्कालीन रिक्त पदांवर निश्चित करण्यात येत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित अनुदानित, विना-अनुदानित तसेच कायम विना-अनुदानित महाविद्यालयांची प्राथमिक तपासणी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षामार्फत करण्यात येते. सदर प्राथमिक तपासणी दरम्यान उपरोक्त नमूद सन २०१६ च्या अधिनियमास अनुसरून रिक्त पदांच्या ४% पेक्षा कमी नाही एवढी पदे आरक्षित राहणारी दिव्यांगांची पदसंख्या संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात येते. प्राथमिक तपासणी झाल्यानंतर सदर बिंदूनामावलीची अंतिम तपासणी मा. सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, पुणे विभाग (पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी) आणि नाशिक विभाग (अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी) यांच्यामार्फत करण्यात येते. मा. सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष हे अंतिम तपासणी अधिकारी असल्याने अंतिम बिंदूनामावली तपासणी अहवालानुसार जाहिरातीची व पदभरतीची पुढील प्रक्रिया महाविद्यालयांकडून राबविण्यात यावी.

यासोबतच दिव्यांग अर्जदार मुलाखतीकरीता पात्र ठरल्यास निवडसमितीमध्ये दिव्यांग प्रतिनिधीचा समावेश असणे अनिवार्य आहे. याबाबत महाविद्यालयांकडून वेळोवेळी विद्यापीठास अवगत करण्यात यावे, जेणेकरुन निवड समितीमध्ये दिव्यांग प्रतिनिधीचा समावेश करण्यात येईल.

Ministry of Law and Justice यांच्याकडुन प्रसिद्ध करण्यात आलेल्या The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या राजपत्राची प्रत माहितीकरीता सोबत जोडण्यात येत आहे. उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये /परिसंस्था यांना कळविण्यात येते की, पदभरती प्रक्रियेत दिव्यांग आरक्षण धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

गणेशखिंड, पुणे-४११००७)
जा. क्र. :आरक्षण/अ१-२२/४२४)
दिनांक: २३/०६/२०२३)

(डॉ. दिपक माने)
प्रभारी कुलसचिव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-

१. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था पुणे, अहमदनगर व नाशिक
   - सदरहू परिपत्रक संबधितांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.
२. कार्यालयीन संचिका

आरक्षण कक्ष
सा. फु. पु. वि. पुणे
आवक क्र. 441
दि. 18/05/23

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 3432
दिनांक : 17/5/2023
जावक दिनांक : 18/05/2023
विभाग : Reservation Cell

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्र.उशिसं/ २०२३/दिव्यांग आरक्षण/मवि-१/ ६४३५ दिनांक- ११.०५.२०२३
16 MAY 2023

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

विषय: महाराष्ट्र राज्यातील अनुदानित उच्च महाविद्यालयांमधील सुरू असलेल्या २०८८ प्राध्यापक पदांच्या दिव्यांग आरक्षणाची व १८ जुलै २०१८ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे (युजीसी) प्रकाशीत भारताच्या राजपत्रातील नियम क्र. ५.१ (a) vi मधील तरतुदीची अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ -१. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२३/ प्र.क्र. २२८/ मशि-५ दिनांक २.०५.२०२३
२. दिव्यांगाचे अधिकार अधिनियम २०१६, दिनांक २८ डिसेंबर,२०१६
३. विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दिनांक १८ जुलै २०१८
४.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय (शुध्दीपत्रक) क्र. Misc-२०१८/C.R.५६/१८/ UNI-१ दिनांक- १० मे, २०१९
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/ प्र.क्र. ११४/ १६अ दिनांक- २९ मे, २०१९
६. मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. दिकआ/ प्र-संघटना-प्र-७/ प्राध्यापक संघ/ अहमदनगर/ २०२२-२३ दि. ०३.०३.२०२३

DR-Res Cell

उपरोक्त विषयी संदर्भांकीत शासन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागाच्या अधिकारकक्षेतील अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील दि. १.१०.२०१७ च्या विद्यार्थीसंख्येवर आधारीत शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या आकृतीबंधास शासन निर्णय क्र. आढावा-१५१३/ प्र.क्र. १२५/ मशि-५ दि. ३.११.२०१८ अन्वये अंतरिम मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने उक्त महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या भरतीस काही नियम व अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णय दि. ३.११.२०१८ ची अंमलबजावणी करण्यास्तव विहीत करण्यात आलेल्या पध्दतीनूसार सदर पदे भरण्यासाठी शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असून त्यानुसार संबंधित प्रत्येक संस्था/ महाविद्यालयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. याच कार्यवाहीचा एक

भाग म्हणजे संस्था/ महाविद्यालयाची बिंदूनामावली तयार करुन ती संबंधित विद्यापीठातील मागास वर्ग कक्षाकडून प्रमाणीत करुन घेणे होय. पदभरती करताना शासनाच्या आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत वारंवार शासनस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत. पदभरतीबाबत शासन निर्णय दि. ३.११.२०१८ च्या शासन निर्णयापुर्वी पासून आरक्षण धोरणाचे नियम ठरविण्यात आलेले आहेत. संस्था/ महाविद्यालयांकडून सदर धोरणाचा पाठपुरावा करण्यात येत असल्याचे दिसून येते.

सदर पदभरतीमध्ये मागासवर्गीय कक्षाच्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याबरोबरच केंद्र शासनाच्या कायदा व न्याय विभागाचे राजपत्र दि. २८ डिसेंबर २०१६ रोजी प्रकाशित दिव्यांगांचे अधिकार कायदा २०१६ तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दि. १८ जुलै २०१८ मधील नियमांचे तसेच संदर्भांकीत शासन निर्णयांचे पालन होणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार संस्था/ महाविद्यालयांनी दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करणे अनिवार्य आहे. तथापी सदर नियमांची अंमलबजावणी होत नसल्याची बाब समोर आली असल्याने दिव्यांग आरक्षण धोरणाची अचूक व परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची आपल्या स्तरावर दक्षता घेण्यात यावी.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १८ जुलै २०१८ रोजीच्या भारताच्या राजपत्रात मार्गदर्शक सुचना प्रकाशित केलेल्या आहेत. या राजपत्रातील कलम क्र. ५.१(a) vi तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय (शुध्दीपत्रक) क्र. Misc- २०१८/C.R.५६/१८/ UNI-१ दिनांक- १० मे, २०१९ मधील तरतुदीनुसार देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापक निवडीसाठी संगठीत करण्यात येणाऱ्या निवड समितीतील सदस्यांत जर अनुसुचित जाती/ जमाती/ ओबीसी/ अल्पसंख्यांक/ महिला/ विविध- अपंग यापैकी कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार अर्जदार असल्यास, त्या प्रवर्गातील प्रतिनिधीत्व करणारा शिक्षणतज्ञ कुलगुरूंनी प्रतिनिधी म्हणून नामनिर्देशित केले पाहिजेत. या नियमान्वये दिव्यांग उमेदवार जर अर्जदार असेल तर दिव्यांग प्रतिनिधी निवड समितीत मा. कुलगुरूंनी नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. या तरतूदीनुसार मा. कुलगुरूंनी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच दिव्यांग आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात याव्यात.

सोबत- वरीलप्रमाणे.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत -१.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे.
३.सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)
२/- दिव्यांग आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित विद्यापीठांकडून कार्यवाही केली जाईल याबाबत विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण यांनी दक्षता घ्यावी.